संदर्भ : डीपर/२०१२/सीईटी/४१ प्रेस नोट दिनांक : ४ सप्टेंबर २०१२

कृपया प्रसिद्धीसाठी
महाराष्ट्रातील सर्व आवृत्त्या

**– वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील २०१३ साली होणाऱ्या प्रवेश परीक्षा –**

महाराष्ट्र शासनाची वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखांतील प्रवेशासाठी घेतली जाणारी सामाईक प्रवेश परीक्षा महाराष्ट्रात एमएचटी-सीईटी या नावाने ओळखली जाते व मागील काही वर्षांपासून ही परीक्षा अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पडत आहे. त्याबद्दल शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन !

हे सर्व सुरळीत सुरू असताना राष्ट्रीय सीईटीबाबत वेगवेगळी धोरणे ठरवतानाचा निर्णय प्रत्येक वेळी काही ना काही कारणाने प्रलंबित होत असल्याने दर वर्षी विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्रीमहोदय मा. ना. राजेश टोपे यांनी अभियांत्रिकी शाखेसाठी २०१४ पासून राष्ट्रीय सीईटीत समाविष्ट होण्याचे संकेत नुकतेच दिलेले आहेत. मात्र तो निर्णय अद्याप मंत्रीमंडळात प्रलंबित आहे असे वृत्तपत्रांतील बातम्यांतून कळते. अभियांत्रिकी शाखेतील प्रवेशासाठी २०१३ साली होणाऱ्या सीईटी परीक्षेच्या मा. मंत्रीमहोदयांच्या वक्तव्यामुळे निर्माण झालेला संभ्रम दूर झालेला आहे. **मात्र २०१३ साली होणाऱ्या सीईटीसाठी इयत्ता १२ वीचे गुण ग्राह्य धरण्यात येणार आहेत का ?** याविषयीची स्पष्टता त्यांनी केलेली नाही. समजा ही परीक्षा दर वर्षीप्रमाणे होणार असेल, तर जी परीक्षा वैद्यकीय शाखेसाठी सामाईकपणे होत होती, ती आता अभियांत्रिकी शाखेसाठी संपूर्णपणे वेगळी होईल का ? वेगळी होणार असेल, तर **त्या परीक्षेचे स्वरूप नेमके काय असेल ?** याविषयी कोणतीही ठोस सूचना अजूनतरी संबंधित संचालनालयांच्या संकेतस्थळावर उपलब्ध नाही.

जोपर्यंत अधिकृत निर्णय जाहीर होत नाही तोपर्यंत मा. मंत्रीमहोदय यांनी दिलेली आश्वासने आणि वृत्तपत्रांत येणाऱ्या बातम्या कितपत सत्य मानायच्या याविषयी सतत संभ्रम असतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे मागील वर्षी वैद्यकीय सीईटीबाबत झालेला घोळ हे सांगता येईल. त्यामुळे अभियांत्रिकी शाखेतील प्रवेश प्रक्रियेबाबतचा शासनाचा दृष्टिकोन/निर्णय अंतिम झाला असेल, तर त्या विषयीची कार्यवाही त्वरित करून संबंधित संचालनालयांच्या संकेतस्थळावर तशा प्रकारची सूचना/अधिसूचना/निवेदन जाहीर करणे आणि विद्यार्थी व पालकांच्या मनातील अज्ञान/संभ्रम कायमस्वरूपी दूर करणे अपेक्षित आहे.

वैद्यकीय प्रवेश परीक्षेसंदर्भातील शासनाच्या वैद्यकीय संचालनालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर (DMER) NEET विषयी दिनांक ३१ ऑगस्ट २०१२ रोजी अधिसूचना जाहीर झाली आहे. त्याद्वारे असे लक्षात येते, की या वर्षी महाराष्ट्र शासन केंद्रातर्फे घेण्यात येणाऱ्या NEET या परीक्षेत सहभागी होणार असून संबंधित परीक्षेविषयीचे बारकावे प्रसृत करण्यात आले आहेत. त्यावरून खालील प्रश्न उपस्थित होतात.

१. या वर्षी इयत्ता १२ वीत असणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी द्याव्या लागणाऱ्या परीक्षेत इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वीचा अभ्यासक्रम असेल. मात्र शासनाच्या अभियांत्रिकी शाखेच्या सीईटी परीक्षेसाठी केवळ इयत्ता १२ वीच्या अभ्यासक्रमाची परीक्षा द्यावी लागेल.

२. जे विद्यार्थी वैद्यकीयसाठी रिपिटीशन करत आहेत अशा विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. कारण ज्यावेळी त्यांनी इ. १२ वी दिली होती, त्यावेळी असलेल्या अभ्यासक्रमात व आताच्या अभ्यासक्रमात बराच बदल झाला आहे. त्यांना इयत्ता १२ वीचा जो अभ्यास करावा लागणार आहे तो बराच बदलेला आहे आणि इ. ११ वीचा अभ्यास आता करायचा झाला, तर त्यांनी सुधारित अभ्यासक्रम अभ्यासलाच नव्हता. त्यावेळी जुना अभ्यासक्रम होता. ज्यांना नवीन अभ्यासक्रमानुसार परीक्षा द्यावी लागणार आहे अशा विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यांपैकी कोणी विद्यार्थी न्यायालयात गेला तर मात्र या परीक्षेचे भवितव्य पुन्हा अधांतरी होऊ शकेल.

३.	वैद्यकीयसाठी NEET परीक्षा रविवार, १२ मे २०१३ रोजी होणार आहे. राज्य शासनाची अभियांत्रिकीसाठीची सीईटी परीक्षा नेमकी त्याच दिवशी होणार आहे, की वेगळ्या दिवशी होणार आहे या संदर्भात अद्याप कोणतेही स्पष्ट निर्देश नाहीत.

४.	शासनाच्या अभियांत्रिकीसाठी सीईटी परीक्षा मागील वर्षीप्रमाणे पीसी १०० गुण व मॅथ १०० गुण अशी २०० गुणांची होणार आहे की सलग पेपर तीन तासांचा करण्याच्या दृष्टिकोनातून ती १८० गुणांची करणार आहे या संदर्भातील संभ्रम अद्यापही कायम आहे.

वरील सर्व पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या पातळीवर मात्र जी एकच सामाईक एमएचटी-सीईटी परीक्षा होत होती, त्याऐवजी आता विद्यार्थ्यांना दोन वेगवेगळ्या परीक्षा द्याव्या लागतील. **त्यामुळे सीईटी परीक्षांची संख्या कमी करणे किंवा सीईटीची एकच सामाईक परीक्षा घेणे या संकल्पनेस ते हरताळ फासल्यासारखे होईल.**

५.	या वर्षी आयआयटीच्या इच्छुक विद्यार्थ्यांना **जेईई-मेन्स आणि जेईई-ॲडव्हान्स** ही परीक्षा द्यावी लागणार आहे. अशा स्थितीत डीपरची विनंती आहे, की विद्यार्थ्यांना नाहक वेगवेगळ्या परीक्षा देण्यापेक्षा खूपच उशीर झाला असल्याने वैद्यकीयसाठी होणारी NEET परीक्षा आता सन २०१३ ऐवजी सन २०१४ ला घ्यावी. म्हणजे वैद्यकीय व अभियांत्रिकीसाठी एकाच वेळी राष्ट्रीय सीईटीला सामोरे जाता येईल.

६.	राष्ट्रीय सीईटी देताना वैद्यकीय प्रवेशासाठी NEET आणि अभियांत्रिकीसाठी जेईई-मेन्स आणि जेईई-ॲडव्हान्स या दोन वेगवेगळ्या परीक्षा द्याव्या लागणार आहेत. मात्र **त्यासाठी असणारा अभ्यासक्रम सारखाच असल्याने या दोन परीक्षांऐवजी राष्ट्रीय पातळीवर समन्वय आणून एकच सामाईक परीक्षा जी वैद्यकीय व अभियांत्रिकीसाठी लागू पडेल अशा पद्धतीने घेण्यासंदर्भात केंद्र शासनास कळवावे व त्या दृष्टिकोनातून आपल्या शासनाने पुढाकार घ्यावा. महाराष्ट्रात सध्या अशीच सामायिक परीक्षा आतापर्यंत झाली.**

राज्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने काम करणारी डीपर ही शैक्षणिक संस्था आहे. राज्यातील खेड्यापाड्यांतील विद्यार्थ्यांमध्ये या परीक्षेविषयी जागरूकता आणि जाण निर्माण करण्याचे कार्य ही संस्था करत आहे. डीपर आयोजित करत असलेल्या परीक्षांची गुणवत्ता व त्यांचे निकाल यावरून संपूर्ण महाराष्ट्रात डीपरच्या परीक्षेचे वेगळे महत्त्व निर्माण झाले आहे. सीईटी परीक्षेबाबत डीपरच्या भूमिकेकडे विद्यार्थी व पालक लक्ष ठेवून असतात.

**राष्ट्रीय सीईटीसाठी डीपर संस्थेचा विरोध मुळीच नाही.** उलटपक्षी डीपर संस्थेसाठी ती एक संधी आहे. सीईटी परीक्षेबाबत काय भूमिका घेतली पाहिजे आणि कोणती तत्त्वे अवलंबली पाहिजेत याविषयी डीपरने SAFETI Principles तयार केली आहेत. डीपरच्या माहितीपुस्तिकेत शेवटच्या पृष्ठावर दिलेले आहे. त्यामुळे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने डीपरची रास्त अपेक्षा अशी आहे, की परीक्षा कोणतीही असो, त्या परीक्षेसंदर्भात सुस्पष्ट कल्पना वेळेत आणि अधिकृतपणे शासनस्तरावर जाहीर व्हावी. परीक्षेसंदर्भात कोणताही संभ्रम वा संदिग्धता असता कामा नये.

राज्य शासनाची एमएचटी-सीईटी परीक्षेची प्रक्रिया अतिशय शिस्तबद्ध आहे. त्यात पारदर्शीपणा जर मोठ्या प्रमाणात आणला तर आपल्या शासनाची परीक्षा सामाईक प्रवेश परीक्षेसाठी सर्वोत्तम उदाहरण ठरू शकेल. गरज आहे ती इच्छाशक्तीची *!*

**(हरीश बुटले)**
संस्थापक सचिव-डीपर
मोबाईल : ९४२२००१५६४
harishbutle@gmail.com